RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

शनिवार, २९ मार्च २०२५ | वर्ष : ५ | अंक : ९२ | दैनिक | किंमत : ₹५/-

Saturday, 29 March 2025 | Year : 5 | Issue : 92 | Daily | Rate: Rs. 5/-

आकाश बोरवेल
धनराज शंभरकर
9890426850
8669852630

प्लॉट, मकान और खेती मे बोरवेल किये जाते है. सबमर्सिबल पंप्स, HDP Pipes, केबल, रोप, पंप फिटींग सामान के विक्रेता.
रेणुका विहार कॉलनी के पास, शताब्दी चौक, रिंग रोड, नागपूर-२७

उपलब्ध आहे!

मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क
मो. 8482839451

# म्यानमारमध्ये भूकंप!

**नवी दिल्ली :** म्यानमारमध्ये शुक्रवारी 7.7 रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपाचे हादरे बसले आहेत. या जोरदार भूकंपानंतर एकच हाहाकार उडाल्याचे पाहायला मिळाले. या भूकंपानंतर लोक धावपळ करताना तसेच इमारती आणि पूल कोसळतानाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अशाच एका व्हिडीओमध्ये बँकॉकमधील एक बांधकाम सुरू असलेली गगनचुंबी इमारत कोसळताना पाहायला मिळत आहे. दरम्यान म्यानमार येथील भूकंपाचे थायलंडसह शेजारील अनेक देशांमध्ये धक्के जाणवले.



एएफपीने दिलेल्या माहितीनुसार ही इमारत कोसळल्यानंतर त्याखाली 43 लोक अडकले आहेत. दरम्यान म्यानमार येथे आलेल्या या भूकंपानंतर सोशल मीडीयावर याचे व्हिडीओ व्हायरल होत आहेत. या समोर आलेल्या व्हिडीओमध्ये रस्त्यांवरील लॅम्पपोस्ट जोरजोरात हलताना दिसत आहेत. तर याच व्हिडीओमध्ये दूर अंतरावर एक उंच इमारत पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळतांना दिसत आहे.

नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीने दिलेल्या माहितीनुसार सकाळी 11.50 वाजता 10 किमी खोलीवर भूकंपाचे धक्के बसले. दरम्यान या शक्तिशाली भूकंपात कोणत्याही जिवितहानी बद्दलची अद्याप माहिती समोर आलेली नाही. म्यानमारमध्ये 20 तर बँकॉकमध्ये आतापर्यंत तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. आता भूकंपानंतरची भीषण दृश्ये समोर येत आहेत. म्यानमार आणि बँकॉकमध्ये अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. तर प्राचीन बौद्ध मंदिरांचेही मोठे नुकसान झाले. दरम्यान सोशल मीडियावर भूकंपाचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. ज्यामध्ये एका मेट्रो स्थानकाचा धक्कादायक व्हिडीओ समोर आला आहे.

**म्यानमार आणि थायलंडमधील भूकंपाच्या स्थितीबद्दल भारताने चिंता व्यक्त केली आहे आणि सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.**

### थायलंड, चीन आणि भारतापर्यंत भूकंपाचे धक्के जाणवले

म्यानमार व्यतिरिक्त, भूकंपाचे धक्के उत्तर थायलंड, चीनमधील युनान प्रांत आणि भारतातील कोलकाता आणि मणिपूरपर्यंत जाणवले.थायलंड, चीन आणि भारतापर्यंत भूकंपाचे धक्के जाणवले. म्यानमार व्यतिरिक्त, भूकंपाचे धक्के उत्तर थायलंड, चीनमधील युनान प्रांत आणि भारतातील कोलकाता आणि मणिपूरपर्यंत जाणवले.

*दुपारी 7.7 रिश्टर स्केलच्या भूकंपाचे हादरे बसल्यानंतर त्यापाठोपाठ 6.8 चे धक्के पुन्हा बसले. त्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. अनेकजण इमारती, रेल्वे स्थानकातून बाहेर पडले आणि मोकळ्या जागेकडे धावू लागले. दरम्यान बँकॉकमधील एका मेट्रो स्थानकावरील सात सेकंदाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.*

युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हेने दिलेल्या माहितीनुसार, दुपारी 12.50 दरम्यान भूकंपाचा धक्का जाणवला. भूकंपाचा केंद्रबिंदु मंडाले शहरापासून वायव्येकडे 17.2 किमी अंतरावर होता.

# रमजानपूर्वी 2,813 कैद्यांना क्षमादान

## 500 भारतीयांचाही समावेश

**नवी दिल्ली :** संयुक्त अरब अमिरातीचे (UAE) राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन झायेद अल नह्यान आणि प्रधानमंत्री शेख मोहम्मद बिन राशिद अल मकतूम यांनी रमजानपूर्वी मोठ्या प्रमाणात कैद्यांची सुटका करण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रपतींनी 1,295 कैद्यांना माफी दिली, तर प्रधानमंत्रींनी 1,518 कैद्यांना क्षमादान जाहीर केले. यामध्ये 500 हून अधिक भारतीय नागरिकांचा समावेश आहे. हा निर्णय म्हणजे UAE आणि भारतातील दृढ संबंधांचे प्रतिक मानले जात आहे.




**कैद्यांच्या नव्या जीवनाची सुरुवात**

या निर्णयामुळे कैद्यांना आपल्या कुटुंबीयांसोबत राहून पुन्हा नव्या जीवनाची सुरुवात करण्याची संधी मिळणार आहे. UAE प्रशासन वर्षानुवर्षे रमजान आणि इतर महत्त्वाच्या प्रसंगी मानवी दृष्टीकोनातून अशा माफीनामा कार्यक्रमाची अंमलबजावणी करते. या निर्णयामुळे केवळ न्यायदानच नव्हे, तर जागतिक स्तरावर UAE च्या सहिष्णुता व सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेचेही दर्शन घडते.

UAE मध्ये मोठ्या प्रमाणावर भारतीय नागरिक काम करत असून, त्यांच्या योगदानाचा प्रशासन नेहमीच सन्मान करते. या पार्श्वभूमीवर, भारतीय दूतावासानेही UAE प्रशासनाचे आभार मानले आहेत. या क्षमादानामुळे अनेक भारतीय कुटुंबांना दिलासा मिळाला असून, त्यांना आपल्या प्रियजनांसोबत रमजान साजरा करण्याची संधी मिळणार आहे. या निर्णयामुळे UAE च्या न्यायव्यवस्थेतील मानवतावादी दृष्टिकोन अधोरेखित झाला असून, तो आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुकास्पद ठरला आहे.

# रविवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नागपुरात



**नागपूर :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी रविवारी 30 मार्चला नागपूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांचे या दौऱ्यात भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार पासून कार्यक्रम स्थळी व त्या मार्गावर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यावेळी मात्र खास संघाशी संबंधित एका नेत्रालयाच्या विस्तारित इमारतीच्या निमित्ताने गुडीपाडव्याला म्हणजे 30 मार्चला मोदींचा नागपूर दौरा ठरला. या दौऱ्यात त्यांचा पहिला कार्यक्रम संघभूमी अशी ओळख असलेल्या रेशीमबागेतील हेडगेवार स्मृती मंदिरात होणार आहे. हेडगेवार यांच्या समाधीचे ते दर्शन घेणार आहेत. नेत्रालय इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमात त्यांच्यासोबत व्यासपीठावर सरसंघचालक डॉ. मोहन भागवत असणार आहेत. मोदी अन्य कार्यक्रमातही उपस्थित राहणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स 9 वा. नागपूर विमानतळावर आगमन होणार असून तेथून ते थेट रेशीमबागेतील राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या स्मृती मंदिर स्थळी जाणार आहेत. तेथे हेडगेवार यांच्या समाधीचे दर्शन घेऊन ते दीक्षाभूमीला भेट देतील. दहा वाजता प्रधानमंत्रींच्या हस्ते हिंगणामार्गावरील माधव नेत्रालयाच्या प्रीमिअम केंद्राची पायाभरणी होणार आहे. त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करतील.

**दीक्षाभूमीच्या सौंदरीकरणासाठी जागेची मागणी**

**नागपूर :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी 30 मार्चला नागपूर दौऱ्यादरम्यान दीक्षाभूमीला भेट देणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर बहुजन समाज पक्षाने दीक्षाभूमीच्या सौंदरीकरण व विकास कार्यासाठी शेजारची 21 एकर जमीन प्रधानमंत्री मोदींनी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. जागतिक कीर्तीचे स्मारक असलेल्या दीक्षाभूमीच्या सौंदरीकरण व विकास कार्यासाठी जागा अपुरी पडत आहे. या स्मारकाला पर्यटनाचा अ दर्जा मिळालेला आहे. मागील अनेक दिवसापासून कापूस संशोधन केंद्राची 5 एकर व आरोग्य विभागाची 16 एकर जागा परम पूज्यनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीला मिळावी यासाठी अनेक वर्षापासून मागणी सुरू आहे.

# विदर्भाचे मुख्यमंत्री असूनही स्वतंत्र राज्याची मागणी कायम




**नागपूर :** संयुक्त महाराष्ट्रासाठी ज्या मुंबईत मराठी माणसांचे रक्त सांडले, त्याच मुंबईत, राज्याच्या राजधानीत राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना दुसरीकडे राज्याची उपराजधानी नागपुरात स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करणाऱ्या विदर्भ राज्य आंदोलन समितीचेही अधिवेशन पार पडले. विद्यमान अवस्थेत ब्रम्हदेव आला तरी विदर्भाचा विकास होऊ शकणार नाही, असा सूर या अधिवेशनाचा होता. विशेष म्हणजे विदर्भातील नेताच राज्याचा मुख्यमंत्री असतानाही असा सूर लावणे हा राज्यकर्त्यांवरील अविश्वासाची भावना कायम असल्याचे प्रतिक मानले जाते.

शेतकरी आत्महत्या आणि स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी हे दोन मुद्दे कधीकाळी राज्याच्याच नव्हे तर देशाच्या माध्यमांमध्ये ठळकपणे गाजत होते. कालातराने ते लोकांच्या अंगवळणी पडले व त्यामुळे ते मागे पडले. माध्यमाकडून त्याची दखल पूर्वी इतक्या प्रखरतेने घेणे कमी झाले. याचा अर्थ त्याचे महत्व कमी होत गेले, असा नाही. ते आजही तितकेच महत्वाचे आहेत. त्यामुळेच विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या नुकत्याच झालेल्या अधिवेशनाचे महत्व अधिक ठरते.

एखादी प्रदेश आपले सर्वस्व दुसऱ्याकडे सोपवून नव्याप्रदेशात समाविष्ट होते. त्यावेळी त्याला दिलेली आश्वासने पाळली जात नाही, उलट सातत्याने अन्याय केला जातो. त्यातून वेगळे होण्याची भावना तयार होते. स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला व ती दीर्घकाळ कायम असण्याला हीच ही भावाना कारणीभूत ठरते. त्यामुळे विदर्भवाद्यांच्या आंदोलनाला किती लोक येतात, अधिवेशनाला कसा प्रतिसाद मिळतो याही पेक्षा ते अजूनही होत आहे हे महत्वाचे आहे, हीच बाब विदर्भ राज्य आंदोलन समितीने त्यांच्या तिसऱ्या अधिवेशनातून बिबवण्याचा प्रयत्न केला.

# कुणाल कामरा याला मद्रास उच्च न्यायालयाचा दिलासा




**मद्रास :** स्टॅण्डअप कॉमेडिअन कुणाल कामराने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक गाणं रचून ते सादर केल्यानंतर तो वादात सापडला आहे. याप्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला असून शिवेसनेच्या नेत्यांकडून कामरा याला अटक करण्याची मागणी केली जात आहे. यादरम्यान कुणाल कामराने आज (28 मार्च) मद्रास उच्च न्यायालयात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. त्यानंतर आता मद्रास उच्च न्यायालयाने शुक्रवारी त्यांचा अंतरिम अटकपूर्व जामीनाचा अर्ज मंजूर केला. कामरा याला 7 एप्रिलपर्यंत दिलासा मिळाला आहे. कारण त्याच्या वकिलांनी महाराष्ट्रातील न्यायालयांमध्ये जाण्यासाठी पुरेसा वेळ देण्याची विनंती उच्च न्यायालयाकडे केली होती.

# स्मार्टफोन वापरण्यात भारतीयांचा तिसरा क्रमांक

**नवी दिल्ली :** मेट्रोमध्ये, बसमध्ये किंवा लोकलमध्ये तुम्हाला साधारण काय चित्र दिसते? एवढेच नव्हे तुम्ही घरी एकत्र जेवायला बसलात तरी तुम्हाला एक कॉमन गोष्ट लक्षात येत असेल, ती म्हणजे सर्वजण मोबाईलमध्ये मान खाली घालून पाहत असतात. वाढत्या मोबाईलच्या वापरामुळे सोशल मिडिया इन्फ्लुअन्सर आणि व्यावसायिक धनाढ्य बनत आहेत. एका अहवालानुसार, स्मार्टफोनवर एक ट्रिलियनपेक्षा जास्त तास भारतीय चिकटून असतात. जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशातील नागरिक व्हायरल व्हिडिओ आणि ऑस्कर विजेते पाहण्यात दंग असतात. तसंच ते आंतरराष्ट्रीय ट्रिप बुक करण्यासाठी स्क्रिनवर चिकटकलेले असतात. म्हणजेच, इंटरनेट डेटा विक्री वाढवण्यासाठी भारत सोन्याची खाण आहे.

**2024 मध्ये 1.1 लाख कोटी तास स्मार्टफोनवर घालवले**

भारतीय स्मार्टफोन पाहण्यात 1.1 लाख कोटी रुपये खर्च करतात. स्वस्त इंटरनेटमुळे जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या या देशात इंस्टाग्रामपासून नेटफ्लिक्सपर्यंतच्या प्लॅटफॉर्मवर भारतीयांनी एकत्रितपणे 2024 मध्ये 1.1 लाख कोटी तास स्मार्टफोनकडे पाहत घालवले, असे EY ने म्हटले आहे.



सरासरी दररोज पाच तास मोबाईल स्क्रीनवर घालवतात, त्यापैकी जवळजवळ 70त्न तास सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, गेमिंग आणि व्हिडिओ पाहण्यास युजर्स पसंती देतात, असे श्वङ्क ने गुरुवारी प्रकाशित केलेल्या वार्षिक मनोरंजन अहवालात म्हटले आहे. यामुळे 2024 मध्ये डिजिटल चॅनेल्स हे भारतातील 2.5 लाख कोटी रुपयांच्या (29.1 अब्ज डॉलर्स) मीडिया आणि मनोरंजन उद्योगातील सर्वात मोठा विभाग बनले आहेत, ज्याने पहिल्यांदाच टेलिव्हिजनला मागे टाकले आहे. भारतीयांनी त्यांच्या मोबाईल फोनवर घालवलेल्या दैनंदिन वेळेत इंडोनेशिया आणि ब्राझील नंतर तिसरा क्रमांक लागतो.

# प्रशांत कोरटकरच्या पोलीस कोठडीत वाढ



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान करणारा, इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना अश्लिल शिवीगाळ करून त्यांना धमकावणारा तथाकथित पत्रकार आरोपी प्रशांत कोरटकरला न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. आज कोल्हापूरच्या सेशन कोर्टात याप्रकरणी सुनावणी पार पडली. त्यानंतर वकील असिम सरोदे यांनी माहिती दिली आहे. असिम सरोदे म्हणाले, प्रशांत कोरटकरला तात्पुरत्या अटकेपासून संरक्षण होते. पण सेशन कोर्टाने अटकेपासून संरक्षणाचा आदेश रद्द केला होता. त्यानंतर उच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. त्यांच्या वकिलांचे म्हणणे आहे की ज्या ज्या कोर्टात त्यांनी अटकेपासून संरक्षण मिळण्याकरता अर्ज केले आहेत, तेथे आरोपी हजर होता, असे समजायचे. पण प्रशांत कोरटकर फरार होता, हे सातत्याने पोलिसांकडून सांगण्यात येते. 'त्यांचे दुसरे म्हणणे आहे की कोरटकरने नागपूर पोलिसांना पत्र लिहिले होते की माझे व्हॉइस सॅम्पल घ्यायचे तर घ्या. प्रशांत कोरटकरचा काही ठाव-ठिकाणा नव्हता, त्याचा पत्ता नव्हता, मग पोलिसांनी त्याच्याशी संपर्क कसा साधायचा? त्यांचे युक्तीवाद कमजोर आहेत.

# तरुणाच्या अवयव दानाने सहा जणांच्या आयुष्यात आनंद फुलला



**लातूर :** लातूर शहरातील एका तरुणाच्या आई-वडिलांनी ब्रेन डेड झालेल्या आपल्या मुलाचे अवयव दान करण्याचा निर्णय घेतला व त्यातून सहा जणांच्या आयुष्यात आनंद फुलला. 19 मार्च रोजी दुचाकी अपघातात लातूर शहरातील भावेश संतोष तिवारी वय 20 राहणार हमाल गल्ली लातूर या तरुणाचा अपघात झाला होता. ब्रेन डेड झाल्याने त्यांचे अवयव दान गुरुवारी हैदराबाद येथे 27 मार्च रोजी करण्याचा निर्णय त्याच्या आई-वडिलांनी घेतला.

# व्यंगात्मक विनोदामुळे आयुष्य अर्थपूर्ण होते : सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली :** गेल्या काही दिवसांपासून स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाकडून कुणाल कामरावर कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे व शिवसेनेचा उल्लेख 'गद्दार' करत कुमाल कामराने एका गाण्याच्या माध्यमातून त्यांच्यावर व्यंग केले होते. यासंदर्भात कुणाल कामराविरोधात गुन्हा दाखल झाला असून खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी कामरावर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर इम्रान प्रतापगढी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे.

कुणाल कामराने एकनाथ शिंदेंना लक्ष्य करून गाण्याच्या माध्यमातून व्यंग केले होते त्यावरून अभिव्यक्ती स्वातंत्र्य व त्याच्या मर्यादा यासंदर्भात मोठी चर्चा पाहायला मिळाली. महाराष्ट्र विधानसभेतदेखील सत्ताधारी बाकांवरून या गाण्याचा व खुद्द कुणाल कामराचा निषेध करण्यात आला. राज्याचे पर्यटन व खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई यांनी तर कुणाल कामराला पोलिसांची थर्ड डिग्री देण्याबाबत विधान केले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस खासदार इम्रान प्रतापगढींबाबतच्या एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अशा व्यंगात्मक विनोदावर भाष्य केले आहे.

3 जानेवारी रोजी प्रतापगढींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुजरातच्या जामनगरमध्ये त्यांनी एका सामुहिक विवाह सोहळ्याला उपस्थिती लावली होती. यासंदर्भात त्यांनी एक गाणे सोशल मीडियावर शेअर केलं होतं. 'ए खून के प्यासे बात सुनो' हे गाणं चालू असलेला एक व्हिडिओ त्यांनी शेअर केला होता. अशा पोस्टमधून राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान दिले गेल्याचा, तसेच धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने प्रतापगढींच्या विरोधातील एफआयआर रद्द करण्याचा निर्णय दिला आहे. 'एखाद्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींच्या समूहाकडून मुक्तपणे विचार मांडले जाणे, मते व्यक्त होणे हा आरोग्यदायी नागरी समाजाचा मूलभूत घटक आहे. जर अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसेल, तर राज्यघटनेच्या कलम 21 मध्ये नमूद करण्यात आलेली सन्मानजनक जीवनपद्धती नागरिकांना मिळणे अशक्य आहे. कोणत्याही आरोग्यदायी लोकशाही व्यवस्थेमध्ये एखाद्या व्यक्ती किंवा समूहाकडून मांडण्यात आलेल्या विचारांना दुसऱ्या विचारांनीच विरोध केला जाऊ शकतो', असे स्पष्ट निरीक्षण यावेळी खंडपीठाने दिलेल्या निकालपत्रात नमूद करण्यात आलेआहे.

**काय म्हटले न्यायालयाने?**

न्यायमूर्ती अभय ओक व न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठासमोर काँग्रेस खासदार इम्रान प्रतापगढी यांच्याविरोधातील अशाच एका प्रकरणाची सुनावणी चालू होती. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. विशेषत: जेव्हा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा येतो, तेव्हा न्यायालयाचे ते महत्त्वाचे कर्तव्य ठरते, जरी एखाद्या व्यक्तीने व्यक्त केलेले विचार बहुसंख्य व्यक्तींना अवडले नाहीत, तरी त्या व्यक्तीच्या विचार मांडण्याच्या स्वातंत्र्याचे रक्षण व आदर व्हायलाच हवा. कोणतंही साहित्य, मग ते कविता, नाट्य, चित्रपट व्यंग किंवा कला असो, त्यातून मानवाचे आयुष्य अधिक अर्थपूर्ण होत असते असे खंडपीठाने म्हटले.

बहुजन सौरभ

वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!



११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ५ एप्रिल सम्राट अशोक यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ

आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

जाहिरात दरपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान एक | - पूर्ण पान | - ६० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - ३० हजार रूपये |
| | - पाव पान | - १५ हजार रूपये |
| अंतिम पान | - पूर्ण पान | - ५० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - २५ हजार रूपये |

शुभेच्छा जाहिरात २००० रु. पासून

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ,
वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे,
तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल -bahujansaurabh@gmail.com
संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

# संपादकीय

## जनसुरक्षा विधेयक म्हणजे लोकशाहीवादी आवाज बंद करण्याचा डाव?

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक 2024 हे पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आले होते. पण, विरोधकांच्या विरोधामुळे ते मंजूर होऊ शकले नाही. सध्या हे विधेयक विधीमंडळातील दोन्ही सभागृहातील सदस्यांचा समावेश असलेल्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्यात आले आहे. या समितीचे अध्यक्ष महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आहेत. सध्या या समितीने राज्यातील जनता, विधीमंडळाचे माजी सदस्य, सामाजिक संस्था, संघटना यांच्याकडून 1 एप्रिलपर्यंत यावर सूचना मागवल्या आहेत. नक्षलवादाचा धोका फक्त नक्षलग्रस्त राज्यांच्या दुर्गम भागांपुरता मर्यादीत राहिलेला नाही. शहरी भागातही नक्षल आघाडी संघटनांद्वारे त्याचे लोण पसरत चालले असून त्याला प्रतिबंध घालण्यासाठी हे विधेयक आणत असल्याचे तेव्हा सांगितले होते. पण, या विधेयकात कुठेही नक्षलवादी संघटना असा उल्लेख नसून फक्त व्यक्ती आणि संघटना असाच उल्लेख करण्यात आलेला आहे. यात संघटना म्हणजे व्यक्तीचे कुठलेही संयोजन, समूह किंवा गट असा आहे. मग तो कोणत्याही विशिष्ट नावाने ओळखला जात असेल किंवा नसेल आणि कोणत्याही कायद्याखाली नोंदणी केलेला असो किंवा नसो, तसेच कोणत्याही लिखित घटनेद्वारे त्याचे नियमन केले जात असो किंवा नसो असा अर्थ देण्यात आला आहे. संघटनेच्या या व्याख्येमुळेही विधेयकावर आक्षेप घेतला जात आहे. अशा संघटनेला बेकायदेशीर ठरवण्याचा अधिकार शासनाला असणार आहे. तसेच सरकारच्या विरोधात आंदोलन किंवा नाराजी व्यक्त करताना कोणत्या सामाजिक संघटनेला किंवा समूहाला बेकायदा ठरवून संबंधिताना अटक करण्याचे अधिकार सरकारला मिळणार आहेत. अशी कोणतीही संघटना बेकायदेशीर संघटना आहे किंवा तशी झालेली आहे असे शासनाला वाटले तर त्याला बेकायदेशीर संघटना असल्याचे शासकीय अधिसूचना काढून घोषित करता येणार आहे. संघटनेच्या व्याख्येसोबतच बेकायदेशीर कृत्यांच्या व्याख्येवरही आक्षेप घेतला जात आहे. विधेयकात कलम 2 मध्ये बेकायदेशीर कृत्यांची व्याख्या देण्यात आली आहे. ते म्हणजे सार्वजनिक सुव्यवस्था, शांतता यास धोका किंवा संकट निर्माण करणे, सार्वजनिक सुव्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करणारी संघटना, हिंसाचार आणि विध्वंसक कृतीमध्ये भीती आणि धास्ती निर्माण करणे. प्रस्थापित कायद्याची आणि कायद्याद्वारे स्थापन केलेल्या संस्थांची अवज्ञा करण्यास प्रोत्साहन देणारे किंवा तसे करण्याचा उपदेश देणारे किंवा अशा कृत्यांसाठी पैसे किंवा वस्तू गोळा करणारे कोणतेही कृत्य बेकायदेशीर मानले जाईल, असेही यात म्हटले आहे. मग ते कृती करून केलेले असो किंवा तोंडी किंवा लेखी किंवा खुणा करून किंवा दृश्य सादरीकरणारद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमातून केलेले असो हे कृत्य बेकायदेशीर मानले जाईल असे या विधेयकात म्हटले आहे. असे बेकायदेशीर कृत्य करण्यामध्ये कुठलीही संघटना गुंतलेली आहे किंवा तिच्या उद्दीष्टांनुसार कोणतेही माध्यम, साधन किंवा अन्य कुठल्याही गोष्टींमार्फत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अपप्रेरणा देते किंवा मदत करते अशा संघटना बेकायदेशीर संघटना ठरतील असेही या विधेयकात सांगितले आहे. यावर आक्षेप असा आहे की ‘या विधेयकाचा उद्देश शहरी नक्षलवाद नष्ट करायचा आहे, असे सरकारचे म्हणणे आहे. मात्र, संपूर्ण विधेयकात नक्षलवाद असा उल्लेख कुठेच दिसत नाही. तसेच संघटनांची व्याख्या देखील अगदी ढोबळ करण्यात आलेली आहे. त्यामुळे आमच्यासारख्या संवैधानिक मार्गाने काम करणाऱ्या संघटनांना अडकवले जाऊ शकते. तसेच बेकायदेशीर कृत्याची व्याख्याही ढोबळमानाने केलेली आहे. त्यामुळे अहिंसक मार्गाने काम करणाऱ्या संघटनांची मुस्कटदाबी करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यात लिखाण, आंदोलन करणाऱ्या संघटना असू शकतील. यामधून सरकारच्या कामाची चिकित्सा करायची नाही, त्याला विरोध करायचा नाही हेच संकेत मिळतात. एकूणच सरकारच्या विरोधात तोंड उघडायचे नाही असे दिसते, असंवैधानिक कृत्याला विरोधच आहे. पण, सरकारने संघटना आणि बेकायदेशीर कृत्य निश्चित अशी व्याख्या द्यावी. तसेच बेकायदेशीर कृतींची व्याख्या खूप व्यापक असून त्यात आंदोलक, मीडिया, लेखक कोणीही अडकण्याची भीती आहे. बेकायदेशीर कृतीत शांतता आणि प्रशांतता बिघडविण्याची कृती म्हणजे सरकार कोणत्याही गोष्टीसाठी गुन्हा दाखल करू शकते. यात लोकशाहीमार्गाने सरकारला केलेला कुठलाही विरोध येऊ शकतो. नक्षलवाद संपवला, असा केंद्र सरकारचा दावा आहे. तर मग दुसऱ्या बाजूला त्यासाठी 2025 ला असा कायदा आणण्याची गरज भासणे हे विरोधाभासी आहे. नक्षलवादाचे समर्थन नाही. पण, त्या नावाखाली लोकशाहीवादी आवाज बंद करण्याचा जो डाव आहे त्याला विरोध आहे. खरे पाहता मुळात हा कायदाच मुलभूत अधिकाऱ्यांच्या विरोधात आहे. जनसुरक्षेच्या नावाखाली आवाज बंद करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. कोणी चुकीच्या गोष्टी करत असेल तर त्यांना थांबविण्यासाठी आधीच कायदे आहेत. नवीन कायद्याची गरज नाही. हा कायदा म्हणजे हुकमशाहीपणाचे लक्षण आहे. बेकायदेशीर संघटनाच्या प्रयोजनासाठी पैसे, रोखे किंवा इतर मालमत्तेचा वापर करण्याचा इरादा आहे असे सरकारला वाटले, त्यांची खात्री पटली तर ते सगळे पैसे शासनाला देण्याचा आदेश काढला जाईल. पण, यात दाद मागण्याची प्रक्रियाही सोप्पी ठेवली नाही. त्यामुळे हे विधेयक नकोच.’ या विधेयकामध्ये उद्देश आणि कारणे या अंतर्गत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावतीने निवेदन देण्यात आलेले आहे. यात फडणवीस म्हणतात, ‘नक्षलवादाचा धोका फक्त नक्षलग्रस्त राज्यांच्या दुर्गम भागापुरता मर्यादीत राहिलेला नसून शहरी भागातही नक्षल आघाडी संघटनांद्वारे त्याचे लोण पसरत चालले आहे. नक्षलवादी किंवा तत्सम संघटना यांच्या संयुक्त आघाडीद्वारे केली जाणारी कृत्ये संवैधानिक जनादेशाविरुद्ध, सशस्त्र बंडखोर विचारसरणीचा प्रचार करण्यासाठी सामान्य जनतेमध्ये अशांतता निर्माण करतात. तसेच राज्यातील सार्वजनिक सुव्यवस्था बिघवडतात.’ आतापर्यंत छत्तीसगड, आंध्रप्रदेश आणि ओडिशा राज्यांनी जनसुरक्षा अधिनियम केले आहेत. आतापर्यंत अशा 48 संघटनांवर बंदी घातली आहे. महाराष्ट्रात कायदा नसल्याने अशा संघटना मात्र सक्रीय आहेत, असे फडणीसांचे म्हणणे आहे. यावर आम जनता काय विचार करते आणि कुठला पवित्रा घेते हे महत्त्वाचे आहे या विरोधात जन आंदोलन अभिप्रेत आहे. ■ ■

बहुजन सौरभ

# आंबेडकर चळवळीचा विश्वकोश

## डॉ. गंगाधर पानतावणे



आंबेडकर चळवळीतील जेष्ठ विचारवंत, साहित्यिक, उत्तम संपादक, प्राध्यापक, संशोधक व अभ्यासक म्हणून त्यांची ओळख आहे. आंबेडकर चळवळीतील प्रत्येक विषयाचे ज्ञान दालन त्यांनी तयार केले. अनेक कवी, लेखक, नाटकार, समिक्षक व विचारवंत त्यांनी निर्माण केले. त्यांचे प्रमुख माध्यम होते त्यांचे लोकप्रिय नियतकालिक ‘अस्मितादर्श’ त्रैमासिक. आयुष्यभर पानतावणेसरांनी आंबेडकरी विचारनिष्ठा जपल्या, वृद्धिंगत केल्या. प्रचार प्रसार केला. यासाठी लेख, पुस्तके व भाषणे दिली. आंबेडकरांचे व बौद्ध विचार समाजातील सर्वदूर घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत राहिले. अस्मितादर्शचे माध्यमाद्वारे वेळोवेळी दिशादर्शन करण्यासाठी झिजले. हे खरे आहे. विचार वाहून नेण्यासाठी सदैव तत्पर राहाणारा पदयात्री. बुद्ध, फुले, शाहू आणि आंबेडकर त्यांचे आदर्श होते. साहित्यातील सर्व लढायांना ते सज्ज असत. अभ्यासपूर्ण व चिंनगर्भ लेख व भाषणातून अनेकांची ते भंबेरी उडवून देत असत. नामांतराचा लढा, रिडल्सचा प्रश्न, रमाबाई आंबेडकर गोळीबार, अरूण शौरीना फॉल्स गॉडसारख्या टिकेला ऊत्तर अशा आणि अनेक समस्यांना वैचारिक लढ्यात कायम अग्रेसर राहिले. गेली चार ते पाच दशके आंबेडकर चळवळीत ते अस्मितादर्शच्या माध्यमातून विविध घटकापर्यंत पोचत होते. अनेकांना त्यांनी प्रतिष्ठा व प्रतिमा निर्माण केल्या. साहित्य क्षेत्रात दलित तथा फुले, शाहू, आंबेडकर साहित्यातील प्रमेय, सिद्धांत व प्रतिमांची चर्चा घडवून आणली. विद्यार्जनाबरोबरच डॉ. बाबासाहेबांचे विचार प्रभावी व प्रगल्भ केले. मुखवट्याचे साहित्य नको फक्त आणि फक्त आंबेडकरी साहित्य हवे हा नारा प्रभावी केला. डॉ. बाबासाहेबांचा विचार व धम्म विचार गावोगाव नेला, ते नियतकालिकाच्या माध्यमातून. माणसे जागृत केली. डॉ. बाबासाहेंबाचे विचार समजताच लोक निळा झेंडा खाद्यावर घेऊन संघर्ष सन्मूख झाली. तसेच वैचारिक लढा परिपक्व व सर्जनशील केला.

**डॉ.गंगाधर पानतावणे यांचा 27 मार्च स्मृतिदिन झाला. त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन करणारा लेख प्रकाशित करीत आहोत – संपादक**

नव्या वाङ्‌मयीन प्रवृत्ती व नव्या जाणिवांचा सांस्कृतिक मंच खुला केला. वैचारिक, समीक्षत्मक व संशोधनपर लेखनाला प्राधान्य देत. नवोदित लेखकांचा वर्ग निर्माण केला. हे सत्य आहे. आंबेडकरी संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी एखादा विषय अभ्यासपूर्ण मांडणीतून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत. ते उत्तम वक्ते होते. त्यांचे भाषण सामान्य माणसाला खिळवून ठेवत. तर अभ्यासकांना विविध बौद्धसंस्कृतीतील संकल्पना, सिद्धांत व प्रमेय सहज सापडत असत. प्राध्यापकपद त्यांनी खूबीने निभावले व एक विचारवंत म्हणून उदयास आले. एखाद्याला लेखक सहज होता येईल परंतू विचारवंत होणे खूप कठीण गोष्ट आहे. दुसरे असे की, साहित्य चळवळीत पानतावणे सरांनी समाज, संस्कृती, धर्म, इतिहास, शिक्षण, बुद्धिवाद, तत्वज्ञान या क्षेत्रातील आंदोलने उभी केली. बुद्धिवादाच्या नव्या नव्या संकल्पनाच्या चर्चा सुरू केल्या. चळवळीचा अग्नी विझू दिला नाही. नव्या अभ्यासक व विद्यार्थ्यांना आंबेडकरवादी प्रोत्साहन दिले. नवा परिवर्तनवादी विचार रूजावा. यासाठी ते सतत क्रियाशील राहिले. यासाठी त्यानी साहित्य, संमेलने व साहित्यिकांचा प्रोत्साहन सुरू केले. पुनःश्च विनम्र अभिवादन....!!! ■ ■

– दत्तात्रय गायकवाड

# वैदिक संघ म्हणजे आरएसएस डबल खेळी

वैदिक संघ म्हणजे आरएसएस डबल खेळी खेळत आहे. एका बाजूला शिवाजी महाराजांचा अपमान करण्यासाठी एक फळी तयार केलेली आहे. त्याच्यामध्ये कोशारी, सावरकर, छिंदम, कोरडकर, बाबासाहेब पुरंदरे, राहुल सोलापूरकर, इत्यादी मंडळींना पुढे करून शिवाजी महाराजांची बदनामी करायची आणि त्याचवेळेस औरंगजेबाला पुढे करून महाराष्ट्रात मुस्लिम आणि हिंदू यांच्या दंगली घडून आणायच्या आणि वैदिक ब्राह्मणांनी दूर राहून गंमत बघायची. हा डाव सध्या महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस करत आहे. नितेश राणे, शिवेंद्र भोसलेसारखी माणसे पुढे करून वातावरण पेटवायचे, शिवाजी महाराजांनी जे केले नाही ते सध्या करण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ करत आहे. हिंदू समाजातील अनेक तरुण वैदिक ब्राह्मणाच्या या नीच कृत्याचा विचार करत नाहीत. महाराष्ट्रातील हिंदूच्या नावावरती हजारो तरुण मुसलमानाच्या विरुद्ध उभा करायची अशा प्रकारचे हा ब्राह्मणी कावा देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केला आहे. आम्ही शिवाजी महाराजांच्या बाजूचे कसे आहोत हे मोठमोठ्याने बोंबलून देवेंद्र फडणवीस सांगतो. त्याच वेळेस देवेंद्र फडणवीस शिवेंद्रराजेला पुढे करून काँग्रेसवर निशाणा साधतो. ब्राह्मणाची एक फौज शिवाजी महाराजाला बदनाम करते. हिंदूची एक फौज मुसलमानाच्या विरुद्ध लढायला उभा करते. हे आपल्या कुणाच्याही लक्षात येत नाही. आपण कारण नसताना या वैदिक ब्राह्मणाच्या इशाऱ्यावरती एकमेकांच्या नरडीचा घोट घेऊ लागलो आहोत. औरंगजेब महाराष्ट्रात मेला खुलताबादला त्याची कबर आहे. ही कबर जवळजवळ साडेतीनशे वर्षांपासूनचे आहे. मग ती कबर उखडायची आत्ताच गरज का भासली? त्याचे कारण देशातला भ्रष्टाचार, देशातील महागाई. देशातील तरुण लोकांना रोजगार नाही आणि याच्या वेदना, त्रास हिंदू बहुजनांना होतो आहे. आपण साधा विचार करत नाही की ब्राह्मणाच्यामध्ये किती सुशिक्षित बेकार आहेत. ब्राह्मणाच्या व्यतिरिक्त इतर हिंदू समाजात, मुस्लिम समाजात, बौद्ध समाजात किती सुशिक्षित बेकार आहेत. तुलनात्मकरित्या विचार केला तर ब्राह्मणाच्या सुशिक्षित बेकार कोणीही नाही. हिंदू तरुणांनी आपल्या सुशिक्षित बेकारीचा जाब सरकारला विचारू नये. म्हणून सरकारच्या विरोधात बंड करू नये



म्हणून आत्ता औरंगजेबाला बाहेर काढलेला आहे. नागपूरच्या दंगलीमध्ये किती ब्राह्मण तरुण सामील झाले याची आकडेवारी कुणीतरी शासनाला मागितली पाहिजे. संतोष देशमुखच्या खुनाचा गाजावाजा होऊ नये आणि देवेंद्र फडणवीकडे जे गृहखाते आहे. या गृहखात्याचा अपयश झाकण्यासाठीही औरंगजेब उपयोगी पडत आहे. लाडक्या बहीण योजनेमध्ये एससी, एसटी समाजाच्या विकासाचे पैसे खर्च केलेत त्याची चर्चा एसीएसटी समाजाने करू नये. या अनेक प्रश्नांसाठी सध्या आरएसएस, देवेंद्र फडणवीसला वाचवण्यासाठी औरंगजेब उपयोगी पडत आहे. याचा विचार, याचे चिंतन हिंदू समाज करायला मागत नाही. राहुल सोलापूरकर सरळ सरळ शिवाजी महाराजांना बदनाम करताना औरंगजेबाला महाराजांनी लाच दिली असे म्हणून बदनाम करत आहे. या बदनामीचा आणि औरंगजेबाची समाधी उकडून टाकण्याचा काहीतरी संबंध असला पाहिजे. याचा विचार आपण कधी करतच नाही. आजच्या घडीला जेवढे हिंदू समाजात म्हणजे ओबीसी, मराठा, बौद्ध या समाजात शिक्षणाचे प्रमाण आहे. याच्या अगोदर साडेतीनशे वर्ष या महाराष्ट्रात शिक्षणाचे प्रमाण कमी असताना किंवा नगण्य असताना हा महाराष्ट्र शांत राहतो. या महाराष्ट्रात लोक गुण्यागोविंदाने रहात होती आणि आत्ताच्या काळात शिकल्या सवरल्याची पिढी जास्त असताना महाराष्ट्रात दंगली होतात, रक्तपात होतात, त्याचा अर्थ नेमका काय आहे? याच्याविषयी हिंदू समाजातल्या तरुणांनी विचार करायला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचे मोठेपण औरंगजेबाची कबर उखडून सिद्ध होऊ शकत नाही, तर शिवाजी महाराजांच्या काळात शिवाजी महाराजांचे जे वर्तन आहे, राजनीती आहे, त्याचा अवलंब करून शिवाजी महाराजांचे मोठेपण आपण सिद्ध केले पाहिजे आणि ही जबाबदारी हिंदू समाजावरती आहे. शिवाजी महाराज तश्यार्थाने महाराष्ट्राचे दैवत होते. शिवाजी महाराजांनी बहुजनांचे राज्य निर्माण केले. म्हणून वैदिक ब्राह्मण शिवाजी महाराजांचा द्वेष करतात, त्यांना बदनाम करतात, हे आम्ही कधी समजून घेणार आहोत? वैदिक ब्राह्मणांनी आत्तापर्यंत शिवाजी महाराजांची केलेली बदनामी याचा लेखाजोखा हिंदू समाजाने विशेषतः बहुजन समाजातील आरएसएसमध्ये सामील असलेल्या तरुणांनी विचार करायला हवा आहे. औरंगजेब, शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर शिवाजी महाराजांच्या विरुद्ध बोलणारे, महाराजांची बदनामी करणारे वैदिक ब्राह्मण किती आणि मुसलमान किती हेही आजच्या घडीला समजून घेणे महत्त्वाचे आहे. मुसलमानाने शिवाजी महाराजांना आपला राजा मानले. त्यामुळे आजचा मुसलमान शिवाजी महाराजांच्या विरुद्ध चुकून सुद्धा बोलत नाही. जेवढे वैदिक ब्राह्मण बोलतात. याचाही विचार व्हायला पाहिजे. ■ ■

– पार्थ पोळके

# बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण

**ईद हा आनंदाचा सण आहे. जरी हा प्रामुख्याने इस्लामचा सण असला तरी, आज जवळजवळ सर्व धर्माचे लोक एकत्र येऊन हा सण साजरा करतात. खरे तर या सणापूर्वी सुरू होणाऱ्या पवित्र रमजान महिन्यात, इस्लाम धर्माचे लोक संपूर्ण महिनाभर उपवास ठेवतात. मुस्लिमांनी या महिन्यात उपवास ठेवणे अनिवार्य आहे. कारण त्यांचा असा विश्वास आहे की यामुळे अल्लाह प्रसन्न होतो. हा सण एखाद्याच्या धर्माप्रती त्याग आणि समर्पणाचे प्रतिबिंबित करतो. हे दाखवते की मानवाने आपल्या मानवतेसाठी आपल्या इच्छांचा त्याग केला पाहिजे. जेणेकरून एक चांगला समाज निर्माण करता येईल. ईद-उल-फित्र एक दिवस आधी चंद्र पाहून निश्चित केला जातो. सौदी अरेबियामध्ये एक दिवस आधी आणि भारतात एक दिवस नंतर चंद्र दिसत असल्याने ईद दोन दिवस साजरी केली जाते. ईद हा एक महत्त्वाचा सण आहे. म्हणून या दिवशी सुट्टी असते. ईदच्या दिवशी सकाळपासून त्याची तयारी सुरू होते.**

रमजानचा चंद्र मावळल्यानंतर आणि ईदचा चंद्र दिसल्यानंतर पहिल्या दिवशी मुस्लिम धर्मियांचा ईद हा सण साजरा केला जातो, ही इस्लाममधील दोन ईदांपैकी एक आहे. इसवी सन् 624 मध्ये बद्रच्या लढाईनंतर पैगंबर मुहम्मद यांनी पहिली ईद उल-फित्र साजरी केली. ईद उल फित्रच्या निमित्ताने अल्लाहचे श्रद्धावान संपूर्ण महिना अल्लाहची पूजा करतात, उपवास ठेवतात आणि कुराण पठण करून त्यांचे आत्मे शुद्ध करतात, ज्याचे बक्षीस किंवा वेतन मिळण्याचा दिवस ईदचा दिवस म्हणून ओळखला जातो, जो जगभरातील मुस्लिम मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करतात. ईद उल-फित्रचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे गरिबांना फित्र देणे बंधनकारक आहे, जेणेकरून जे लोक गरीब आहेत आणि त्यांची ईद साजरी करण्यास भाग पाडले आहेत, ते नवीन कपडे घालू शकतील आणि समाजात एकमेकांसोबत आनंद वाटू शकतील. ज्यांच्याकडे 52.50 तोळा चांदी किंवा 7.50 तोळा सोने आहे त्यांच्यावर फित्र अनिवार्य आहे. त्यांनी स्वतःसाठी आणि त्यांच्या अल्पवयीन मुलांसाठी सदका-ए-फित्र द्यावे, जे ईद-उल-फित्रच्या नमाजपूर्वी करावे लागेल. ईद हा बंधुता आणि परस्पर सौहार्दाचा सण आहे, ईदच्या दिवशी लोक एकमेकांच्या हृदयातील प्रेम वाढवण्यासाठी आणि द्वेष दूर करण्यासाठी एकमेकांना मिठी मारतात. रमजान हा इस्लामिक कॅलेंडरचा नववा महिना आहे, ज्यात कुराण इस्लामी संदेष्टा मुहम्मद यांना अवतरले आहे. जगभरातील मुस्लिम प्रार्थना, प्रतिबिंब आणि समुदाय, उपवासाचा महिना (सॉम) म्हणून पाळतात. मुहम्मद (सल्ल)च्या पहिल्या प्रकटीकरणाची आठवण म्हणून रमजान महिन्यातील उपवास हा इस्लामच्या पाच स्तंभापैकी एक आहे आणि चंद्रकोर चंद्राच्या एका दिसण्यापासून दुसऱ्यापर्यंत, एकोणतीस ते तीस दिवस टिकते. पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास करणे हे सर्व प्रौढ मुस्लिमांसाठी अनिवार्य आहे, त्यामुळे ते या महिन्यात मुस्लिम लोक पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत दिवसाच्या प्रकाशात उपवास करून घालवतात. जे तीव्र किंवा दीर्घकाळ आजारी नसलेले, प्रवास करणारे वृद्ध, स्तनपान करणारे मधुमेह किंवा मासिक पाळीत आहेत. पहाटेच्या जेवणाला सुहूर असे संबोधले जाते आणि रात्रीच्या जेवणाला इफ्तार म्हणतात. मध्यरात्री सूर्य किंवा धृवीय रात्र असलेल्या प्रदेशात राहणाऱ्या मुस्लिमांनी मक्काचे वेळापत्रक पाळावे, असे फतवे जारी केले गेले असले तरी सर्वात जवळच्या



देशाचे वेळापत्रक पाळण्याची प्रथा आहे, ज्यात रात्र दिवसापासून वेगळी केली जाऊ शकते. असे मानले जाते की उपवासाचे आध्यात्मिक बक्षिसे रमजानमध्ये वाढतात. त्यानुसार मुस्लिम केवळ खाण्यापिण्यापासूनच नव्हे तर तंबाखूजन्य पदार्थ, लैंगिक संबंध आणि पापी वर्तनापासूनही परावृत्त करतात, नमाज आणि कुराण पठण करण्याऐवजी स्वतःला समर्पित करतात. उपवास संपल्याच्या आनंदाव्यतिरिक्त, या ईदच्या दिवशी मुस्लिम अल्लाहचे आभार मानतात. कारण अल्लाहने त्यांना महिनाभर उपवास ठेवण्याची शक्ती दिली. तथापि, उपवास करून मोक्ष कधीच शक्य नाही. कारण पवित्र शास्त्रांमध्ये त्याचा उल्लेख नाही. पवित्र कुराण शरीफमध्ये बख्बर संतांकडून योग्य उपासनेचा मार्ग स्वीकारून पूर्ण मोक्ष मिळविण्यासाठी सर्वशक्तिमान अल्लाहची उपासना करण्याची सूचना देखील दिली आहे. ईदच्या काळात कुटुंब आणि मित्रांमध्ये भेटवस्तूंची देवाणघेवाण होते. शेवई हा या सणातील सर्वात महत्त्वाचा पदार्थ आहे, जो प्रत्येकजण मोठ्या आवडीने खातात. ईदच्या दिवशी प्रत्येक मुस्लिमाने मशिदींमध्ये सकाळच्या नमाजपूर्वी दान किंवा दान करणे बंधनकारक आहे. या देणगीला ‘जकात उल-फित्र’ म्हणतात. हे दान कोणत्याही दैनंदिन अन्नपदार्थाचे दोन किलोग्रॅम असू शकते, उदाहरणार्थ पीठ किंवा त्या दोन किलोग्रॅमच्या किंमतीचे देखील. त्यानंतर ही जकात गरिबांमध्ये वाटली जाते. इस्लामी दिनदर्शिका चंद्रावर अवलंबून आहे, जिथे प्रत्येक महिन्याची सुरुवात होते, जेव्हा नवीन चंद्राची पहिली चंद्रकोर दिसते. इस्लामी वर्षात 12 चंद्र चक्रे असतात आणि परिणामी ते सौर वर्षापेक्षा 10 ते 11 दिवस लहान असते आणि त्यात कोणतेही अंतर नसल्यामुळे रमजान संपूर्ण ऋतूंमध्ये स्थलांतरित होते. इस्लामी दिवस सूर्यास्तानंतर सुरू होतो. अनेक मुस्लिम रमजानच्या सुरुवातीस चंद्राच्या स्थानिक भौतिक दर्शनाचा आग्रह धरतात, परंतु इतर लोक महिन्याची सुरुवात निश्चित करण्यासाठी नवीन चंद्राची गणना केलेली वेळ किंवा सौदी अरेबियाची घोषणा वापरतात. जागतिक स्तरावर नवीन चंद्र एकाच वेळी एकाच स्थितीत नसल्यामुळे, रमजानच्या सुरुवातीच्या आणि समाप्तीच्या तारखा प्रत्येक संबंधित स्थानावर कोणत्या चंद्राचे दर्शन घेतात यावर अवलंबून असतात. परिणामी रमजानच्या तारखा वेगवेगळ्या देशांमध्ये बदलतात. परंतु सामान्यतः फक्त एका दिवसाने, हे चंद्राच्या चक्रामुळे होते. चंद्र मेन चंद्रकोर म्हणून पात्र होण्यासाठी निकष पूर्ण करू शकत नाही, जे एका ठिकाणी सूर्यास्ताच्या वेळी आणि नंतर दुसऱ्या ठिकाणी भेटेल तेव्हा महिन्यांतील बदलाचे वर्णन करते. खगोलशास्त्रीय अंदाज जे रमजानची सुरुवात अंदाजे उपलब्ध आहेत. इस्लामच्या मते कुराण या महिन्यात सर्वात खालच्या स्वर्गात पाठवण्यात आले होते, अशा प्रकारे जिब्राईलने मुहम्मद यांना हळूहळू प्रकटीकरणासाठी तयार केले होते. म्हणून मुहम्मद यांनी आपल्या अनुयायांना सांगितले की स्वर्गाचे दरवाजे संपूर्ण महिनाभर उघडे राहतील आणि नरकाचे दरवाजे (जहन्नुम) बंद होतील. पुढील महिन्याचे पहिले तीन दिवस, शव्वाल, उत्सवात घालवले जातात आणि ‘ब्रेकिंग फास्टचा सण’ किंवा ईद अल-फितर म्हणून साजरा केला जातो. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या या पवित्र प्रसंगी अल्लाह तुम्हा सर्वांना आनंद देवो आणि तुमच्या प्रार्थना स्वीकारो, सर्वांना ईद-ए-मिलाद-उन-नबी मुबारक! ■ ■



प्रविण बागडे
मो. 9923620919

## साठोत्तरातील मित्रांचा 40 वा स्मरण सोहळा

# मित्रांनो ‘शांती का पैगाम लेके चलो’

1980 च्या दशकात आम्ही विद्यार्थी मित्र वेगवेगळ्या कारणाने एकत्र आलो होतो. आमचे कॉलेज एक नव्हते. आमची शिक्षण फॅकल्टी एक नव्हती. कॉमर्स, आर्ट, विधी, सायंस, कृषी, मेडीकल, सर्व विविध शिक्षणक्षेत्राचे आम्ही, त्या सर्वांना सूत्रात जोडणारा आमचा मित्र अंबादास मोहिते उर्फ ‘लाल्या’, त्याला लाल्या का म्हणतात हे कोड आजही उमगल नाही. पण अंबादास मोहीते नाव विद्यापीठ विद्यार्थी संघाचे अध्यक्ष म्हणून ऐकले होते.

तसा आमचा राजकारणाशी कवडीचा संबध नाही. कारण विद्यापीठाच्या राजकारणात सातत्याने विद्यापीठ परिक्षेत पास होणारे, निवडणूकांमध्ये उमेदवार होऊ शकत होते. पण आमचे फर्स्ट इयरच नापासपासून सुरू झाले. पण त्याचवर्षी नागपूर विद्यापीठाने ‘एटीकेटी’ हा नवीन नियम आणला आणि आम्ही तरलो. बसता-उठता ग्रॅज्युएट झालो.

अंबादास मोहिते हे राजकीय व्यक्तीत्व ‘एनएसयुआय’ काँग्रेस पक्षाच्या राजकीय पक्षाचे, या विद्यार्थी संघटनेचे श्रीकांत जीचकार गटाचे ते प्रभावी नेतृत्व, मात्र आम्हाला विद्यापीठाच्या ‘राष्ट्रीय सेवा योजना’ यातून मिळाले. ‘युवक बिरादरी’ या संघटनेच्या नागपूर शाखेत त्यांनी आम्हाला जोडल. नंतर मैत्रीचा धागा मात्र त्यांनी जपला तो आजपर्यंत कायम आहे. विद्यापीठ निवडणूका म्हणजे तरूण मनाचे नेतृत्व निर्माण करणारी पाठशाळा, पण विद्यापीठ प्रतिनिधी पळविणे, त्यांना डांबून ठेवणे, राजकीय पुढाऱ्यांचा आणि भांडवलदारांच्या पैशाने या निवडणूका



गुंडागर्दीकडे वळल्या. तरुण राजकीय पुढाऱ्यांच्या फळ्या उभ्या राहणे थांबले. निवडणूकांवर भांडवली अर्थव्यवस्था हावी झाली. जातीयवाद-धर्मवाद फोफावला. भाई-भतीजा वाद फोफावला. परिवारवाद फोफावला. सामाजिकभान असणारे कार्यकर्ते निर्माण होण्यापेक्षा ‘काड्या करणारे’ धुरंधर निर्माण होऊन राजकारणाच, बाजारीकरण भारतीय लोकशाहीचा घात करीत आहे. ऐंशीच्या दशकातले शंभर-दिडशे आम्ही तत्कालीन तरूण रविवार 23 मार्च 2025 ला नागपूरात, आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत होतो. फाटक्या कपड्यातले आम्ही तुटक्या सायकलीवर फिरायचो. गावखेड्यातून आलेले विद्यार्थी आपल्या विद्यार्थी दशेच्या आठवणीतील मित्र शोधत होते. कारण मित्रांचे काळे केस गळलेले, टक्कलछाप मित्र काहींचे काळ्या कल्पातून डोकावणारे पांढरे केस, पण चेहऱ्यांवर उत्तुंग हास्य मनाला आनंद देणारे. आमचे शेखर सावरबांधे मात्र पूर्ण केसाचे काळेभोर डोके सांभाळून होते. अतुल भुसारी आणि डॉ. शांतीदास लुंगे आपला गळा साफ करीत फोटो काढण्याची हाऊस भागवत होते. डॉ. अविनाश रोडे डोळ्याला चष्मा न लावता रजिस्टरवरची नावे वाचत साठी ओलांडलेल्या तरूणांना स्टेजवर आपल्या परिचय देण्यासाठी बोलावतांना, अतुलची पार्सलिटी मात्र जाणवत होती. नाव मागे पुढे माझे (ज्ञानेश्वर रक्षक) आणि संजय भक्ते आम्हालाच आमचे अस्तित्व सांगावे लागले. म्हणजे वय वाढले की स्वभाव बदलतो हे मनाला पटत नव्हते. सम्यक थेटरचा आमचा मित्र नरेश साखरे त्याचे नाचणे त्याचे वय लपवत होते. नरेंद्र इंगळे आणि कोल्हे तसेच काही डॉक्टरी पेशात वावरणाऱ्यांच्या गाण्याचे बोल आमच्यातले तारुण्य जागवत होत. साऱ्यांचे पाय झिंगाट गाण्यावर थरारत होते. काहींनी आपले मनोगतही परिचय देतांनाच ऐकवले. चाळीशी आधीच्या मित्रांकडून अपेक्षा केली. आपल्या मुलांच्या, नातवांच्या भविष्यासाठी ‘शांतीका पैगाम घर घर लेके चलो’ हा भाव सर्वांच्या बोलण्यातून जाणवत होता. कुलगुरू वेळूकर मोठ्या भावाच्या भूमिकेत वावरतांना दिसले. अनेकांनी वेळूकर सरांची आम्हाला कशी आमच्या मुलांच्या शिक्षणासंबधी उच्चपदावर व्यस्त असतांना कशी मदत केली, ते कृतज्ञता भाव व्यक्त करीत होते. सर मात्र स्मितहास्य करीत होते. धनवटे कॉलेजमध्ये विद्यार्थी दशेतून प्राचार्य पदापर्यंत पोहचलेले बहुजनांचे नेतृत्व बबनराव तायवडे नागपूर विद्यापीठात ‘यंग टीचर्स’ नावाची संघटना उभी करून अनेकांमध्ये प्राध्यापक बनण्याची लायकी निर्माण करतो. शिक्षणाच्या क्षेत्रात उंच भरारी मारूनही आपली माती आणि आपली माणसे जोपासतो. त्यांचा सहभाग अनेकांना प्रेरणा देणारा होता. कारण फाटक्या कपड्यातील आम्ही सारे शहेंनशाहा आज जरी श्रीमंती आपल्या कवेत घेतली, तरी धनाचा माज आणि प्रतिष्ठेचा माज आमच्यात माजला नाही. पूर्वाश्रमीची संध्या जिचकार आताची संध्या नरेंद्र इंगळे, प्लास्टरच्या पायाला न जुमानता सगळ्यांना भेटत होती. शाम पौणीकरांचे स्मितहास्य आमच्या महाविद्यालयीन जीवनाची आठवण देत होते. मस्त मित्रांचा स्नेह- मेळावा, मस्त आनंद, दुःखाला हरवण्याची ताकत आणि आरोग्य सांभाळण्याची काळजी करा, काहींचा सल्ला, नवउर्मी देत पुन्हा पाच वर्षांनी एवढ्याच तारूण्याने भेटूया सांगत होते. पण या सर्व तारूण्याला चाळीस वर्षापासून आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त करणारे सुरेश पारळकर आणि दिलीप पारळकर हे दोन्ही पारळकर बंधू यांची भेट तर सर्वांना मोहून टाकणारी होती. ते आठवणीतले दिवस, खिशात पैसे नाही, त्यांच्या महालमधील स्टुडीओ आज जमीनदोस्त झालेला, त्यात आम्ही आमचे फोटो शोधायचो, कुठल्या तरी कार्यक्रमाचे, पारळकर बंधूना कळायचे, कारण गरीबीचे चटके त्यांनीपण सोसलेले. आमच्या हातात फोटो ठेवायचे. जमेल तेव्हा द्या पैसे, पण अनेकांच्या उधाऱ्या बाकीच असाव्यात. ‘कालाय तसमें नमः’ तरी पारळकर बंधूंच्या चेहऱ्यावरचे हास्य आजही कायम. सहज लिहता झालो, अनेकांना जागे अभावी टाळले. काही माझ्यासाठी नवीन चेहरे होते. आपल्या सर्वांचे आयुष्य आनंदी राहावे. 23 मार्च 2025 रविवार दिवस पुन्हा स्मरणात राहील. ■ ■



ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
मो. 9823966282

# मराठी भाषेला समृद्ध करणारे साहित्यिक



डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म 29 मार्च 1948 रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. 1969 साली डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बीए ची पदवी मिळवली. बीए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एमए पूर्ण केले आणि 1981 साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएचडी मिळवली. 1971 ते 1977 या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले 1977 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. 2005 ते 2010 पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी 1970 पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह 1976 साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथासंग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य - स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री-पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी. बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. 2012 साली चिपळूण येथे झालेल्या 86 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर 30 नोव्हेंबर 2022 रोजी आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! ■ ■



श्याम ठाणेदार, पुणे
9922546295

## महत्वाचे

### साखळी उपोषणाचा 178 दिवस




**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क बचाव कृती समिती नारा नागपूर दिनांक 28-03-25- साखळी उपोषणाचा 178 दिवस आहे. साखळी उपोषणाला बसलेल्या महिला यमूना रामटेके, विजया पाटील, रेखा खोब्रागडे, अल्का रक्षित, शशीकला चालखोरे, बेबी गजभिये, वनिता वालदे, जीजा रामटेके आदी सहभागी झाल्या होत्या

### बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी समारोह समितीची आज सभा

**नागपूर :** रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष व राज्यसभेचे माजी उपसभापती बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या जन्मशताब्दी समारोह निमित्त आयोजित विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी 9 एप्रिल स्मृति दिन निमित्ताने बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे मार्ग नामकरण कार्यक्रम शनिवार दि. 29 मार्चला दुपारी 12 वाजता, आमदार डॉ. नितिन राऊत यांचे जनसंपर्क कार्यालयातील सभागृहात बेझनबाग येथे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांची सभा, आयोजन समितीचे अध्यक्ष, प्रा. अशोक गोडघाटे यांचे अध्यक्षतेखाली व आमदार डॉ. नितिन राऊत, विचारवंत ताराचंद्र खांडेकर, ई. मो. नारनवरे, प्रा. गौतमी डोंगरे खोब्रागडे यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली आहे. सर्वांनी उपस्थित राहावे असे अशोक कोल्हटकर, सुरेश पाटील, नरेश वाहने, भीमराव वैद्य, उमेश बोरकर, विलास गजभिये, एन. टी. मेश्राम आदींनी केले आहे.

### भारतीय राज्यघटना पुस्तकाचे प्रकाशन



**नागपूर :** नवीन शेक्षणिक धोरण आधारित मूल्य शिक्षण अभ्यासक्रम (VEC) या विषयाला पूरक पुस्तके इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वर येथील समाजशात्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र कांबळे आणि इतिहास विभाग प्रमुख प्रा. राजेश घोडेस्वार यांच्याद्वारा लिखित भारतीय राज्यघटना या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. अजय चिकाटे, पी. डब्लू. एस. संस्थेचे सहसचिव धर्मेंद्र बनसोड यांचे हस्ते पार पडले. या प्रसंगी संजय गजघाटे, अतुल श्रृंगारपवार, डॉ. हेमंत बागडे उपस्थित होते. भारतीय राज्यघटना हा विषय अभ्यासक्रमात लागू केल्यामुळे विद्यार्थी भारतीय मूल्य आत्मसात करतील असे मनोगत संस्थेचे सहसचिव बनसोड यांनी व्यक्त केले. प्राचार्य चिकाटे यांनी डॉ. कांबळे आणि प्रा. घोडेस्वार यांचे अभिनंदन करत हा पुस्तक रूपातील ठेवा महाविद्यालयासाठी सदैव उपयोगी ठरेल व विद्यार्थीचे ज्ञानवर्धन करेल असे उद्‌गार काढले. संचालन डॉ. राजेंद्र कांबळे यांनी तर आभार प्रा. राजेश घोडेस्वार यांनी मानले.

### आकांक्षा प्रकाशनची राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धा

**नागपूर :** आकांक्षा प्रकाशनच्या वतीने राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेचे हे चौथे वर्ष आहे. आकांक्षा प्रकाशन गेली अनेक वर्षे साहित्य क्षेत्र आणि सामाजिक क्षेत्रातही वेगवेगळे कार्यक्रम राबवत असते. वाचक-लेखक मेळावे, साहित्य संमेलन, बालसाहित्य संमेलन, कवी संमेलन, लिहित्यांची कार्यशाळा, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन आम्ही नेहमी करीत असतो. अलीकडच्या काळात आम्ही कथास्पर्धा सुरू केलेली आहे. राज्यभरातून वीस वर्षांवरील कुणीही या स्पर्धेत भाग घेऊ शकतात. कथा मराठीतच असावी. तसेच अप्रकाशित आणि स्वलिखितच असावी. विषयाचे बंधन नाही, मात्र ती अडीच ते तीन हजार शब्दमर्यादेत असावी. वऱ्हाडी, ग्रामीण, बोलीभाषा, प्रमाणभाषा कोणत्याही मराठी भाषेत लिहिलेली चालेल. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. प्रथम पुरस्कार अडीच हजार, द्वितीय पुरस्कार दोन हजार, तृतीय पुरस्कार एक हजार तसेच ग्रंथ भेट, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्कारांचे स्वरूप असेल. कथा 30 मे पर्यंत मेल आयडीवर केवळ युनिकोड मध्ये किंवा क्षस्न पाठवावी, असे आकांक्षा प्रकाशनच्या संचालक अरुणा सबाने यांनी कळविले आहे. मेल आयडी : arunasabanevwx@gmail.com अधिक माहितीसाठी स्पर्धेच्या प्रमुख धनश्री पाटील 99214 07479 यांच्याशी संपर्क करावा.

# जिल्ह्यात बालरक्षा अभियान गतिमान

- मुलांचे अधिकार जपण्याचा शिक्षकांचा संकल्प
- केंद्रस्तरावर नेमले नोडल ऑफिसर

**नागपूर :** राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या वतीने मागील महिन्यात राज्यातील बालकांच्या हक्कांच्या आणि सुरक्षेच्या दृष्टीने बालरक्षा अभियान सुरू करण्यात आले होते. या अभियानाची सुरुवात नागपूरमधूनच करण्यात आली. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य ॲड. संजय सेंगर आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश सचिन पाटील आवर्जून उपस्थित होते. त्यांनी नागपूर शिक्षण विभागाच्या बालकांसाठी काम करणाऱ्या इतर विभागांची असलेल्या समन्वयाचे कौतुक केले होते.

बालरक्षा अभियानांतर्गत जिल्ह्यातील 1050 शिक्षक पालक व विद्यार्थी यांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार आठ टप्प्यात 970 शिक्षक, केंद्रप्रमुख, पालक, विद्यार्थी यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणात मुलांचे प्रकार विशेष गरजा असलेली मुले, मुलांचे हक्क - अधिकार आणि मुलांच्या हक्कांचे संरक्षण करणारे कायदे तसेच जिल्हास्तरावरील यंत्रणा यांची विस्तृत माहिती प्रशिक्षणात त्यांना देण्यात आली. त्यामुळे मुलांसाठी काम करणाऱ्या व्यक्तींना आपण एकटे नसून संपूर्ण शासन प्रशासन व यंत्रणा आपल्या पाठीशी आहेत याचा विश्वास मिळाला.



प्रशिक्षणाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळुसे आणि माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बालरक्षण समन्वयक प्रसेनजित गायकवाड यांनी केले. प्रशिक्षणाला मार्गदर्शक म्हणून विकला. फाउंडेशनचे सहकार्य लाभले तसेच प्रसेनजीत गायकवाड यांनीही विविध विषयांवर शिक्षकांशी चर्चा घडवून आणली.

बालकांच्या हक्काची जपणूक करण्यासाठी आणि संरक्षणाची जबाबदारी म्हणून नागपूर जिल्ह्यात केंद्र स्तरावर बालरक्षा पर्यवेक्षण अधिकारी (नोडल ऑफिसर) नेमण्यात येणार आहेत. हे अधिकारी केंद्रप्रमुख आणि ज्या केंद्रांना नियमित केंद्रप्रमुख नसतील त्या केंद्रातील एक शिक्षक असतील. या नोडल अधिकाऱ्यांकडे आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा आणि त्यांच्या हक्कांबद्दल जाणीव जागृती करण्याचा व त्यांच्या सोयी सुविधांचा आढावा घेण्याचे कार्य असेल. केंद्र स्तरावर होणाऱ्या मासिक शिक्षण परिषदांमध्ये याबाबत जाणीव जागृती करण्यात येणार आहे. तसेच पालक सभांमध्येही याची माहिती देण्याची जबाबदारी त्यांची राहणार आहे.

## डॉ. मधुकरराव वासनिक यांनी मेडिकलच्या बालरोग विभागाला स्वतंत्र दर्जा प्राप्त करुन दिला : धर्मेन्द्र बनसोड

**नागपूर :** माजी आमदार, वेगळ्या विदर्भ आंदोलनाचे पूरोधा तथा पिपल्स वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक डॉ. मधुकरराव वासनिक यांच्या प्रथम स्मृतीदिन कार्यक्रम इंदिरा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय कलमेश्वर येथे पीपल्स वेल्फेअर सोसायटीचे संयुक्त सचिव धर्मेन्द्र बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच प्राचार्य डॉ. अजय चिकाटे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. डॉ. वासनिक यांच्या स्मृती प्रित्यर्थ निर्माण करण्यात आलेल्या प्रेरणाभूमी स्मारकावर अतिथी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. श्रद्धांजलीचा मुख्य कार्यक्रम कमलाबाई वासनिक सभागृहामध्ये झाला. याप्रसंगी मुख्य वक्ता धर्मेन्द्र बनसोड यांनी आपल्या संबोधनातून डॉ. वासनिक यांच्या कार्याला स्मरण करुन सांगितले की, त्यांचे व्यक्तीमत्व अष्टपैलू होते. वैद्यकीय क्षेत्राशिवाय त्यांनी शिक्षण, क्रिडा, साहित्य, राजनीति, समाजसेवा यात भरपूर कार्य केले. त्यांच्या अमूल्य योगदानाला मेडीकल क्षेत्र कदापि विसरू शकणार नाही.




श्रद्धांजली सभेत डॉ. चिकाटे, प्रा. राजेंद्र कांबळे, प्रा. अतुल श्रृंगारपवार, प्रा. संजय गजघाटे, प्रा. राजेश घोडेस्वार, प्रा. मंजूषा ढोबळे यांनी संबोधित करून श्रद्धांजली अर्पण केली. प्रास्ताविक डॉ. हेमंत बागडे यांनी केले. सभेचे संचालन प्रा. मंजुषा कापसे यांनी केले. कार्यक्रमात प्रभाकर प्रधान, मलिक परवेज, प्रा. उमाकांत बल्ले, प्रा. रोशन भगत, प्रा. राकेश लोहकरे, सुकन्या घाटोले, प्रा. निधी गुप्ता, विनोद पटे, प्रा. चेतन ठवरे, प्रा. गणेश जोत, सुधीर वाघमारे आदिसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## ठेकेदार आणि मृतकाच्या कुटुंबीयांमध्ये परस्पर सामंजस्यावर समझोता

**नागपूर :** चिखली चौक येथील बांधकाम साईटवर काम करताना दुर्दैवी अपघात झाला. ठेकेदार अखिलेशकुमार चौबे यांच्या साईटवर काम करणारे सुनील कटरे हे 18 फूट उंचीवरून खाली कोसळल्यामुळे त्यांचा गंभीर अपघात झाला. या अपघातामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यांना तत्काळ भवानी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. 26 फेब्रुवारी 2025 ते 3 मार्च 2025 या काळात आयसीयूमध्ये उपचार सुरू असतानाही प्रकृती खालावल्याने 3 मार्च रोजी सायंकाळी 7.30 वाजता डॉक्टरांनी सुनील कटरे यांना मृत घोषित केले. या समेटानुसार, ठेकेदाराने उपचारासाठी आधीच 2 लाख रुपये खर्च केले होते आणि पुढील आर्थिक मदत म्हणून मृतकाच्या कुटुंबीयांना 6 लाख रुपयांची मदत जाहीर केली.या सामंजस्य करारावर मृतकाचे वडील रामचंद्र कटरे आणि मृतकाची पत्नी सविता सुनील कटरे यांनी सहमती दर्शवली असून भविष्यात ठेकेदार अखिलेश चौबे यांच्यावर कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा दावा करणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले आहे.

**यामध्ये खालीलप्रमाणे आर्थिक मदत देण्यात आली :-**

1. 1 लाख रुपये रोख रक्कम - 4 मार्च 2025 रोजी.
2. 2,50,000 रुपयांचा चेक (चेक क्रमांक 000022) - 25 मार्च 2025 रोजी मृतकाचे वडील रामचंद्र कटरे यांच्या नावाने.
3. 2,50,000 रुपयांचा चेक (चेक क्रमांक 000021) - 25 एप्रिल 2025 रोजी मृतकाची पत्नी सविता सुनील कटरे यांच्या नावाने.



## भोयर, पवार सह महाराष्ट्रातील 15 जातीचा केंद्रीय ओबीसी यादीत समावेश करा : खा. अमर काळे

**नागपूर :** दि 26 मार्च, केंद्रीय ओबीसी यादीत भोयर पवारमध्ये समावेश करणेबाबत गेल्या 11 वर्षापासून अखिल भारतीय भोयर पवार महासंघ व सहकारी संघटना केंद्र सरकार व राष्ट्रीय ओबीसी आयोग यांचेकडे करीत होते. महाराष्ट्र ओबीसी आयोग व महाराष्ट्र शासनाचे शिफारशी नंतर राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष महाराष्ट्राचे सुपुत्र हंसराज अहिर झाल्यानंतर या लढाईला बळ मिळाले. राष्ट्रीय ओबीसी आयोगाने सुनावण्या घेऊन दि. 8 ऑक्टोबर 2024 ला भोयर, पवार सह महाराष्ट्रातील 15 जातीचे केंद्रीय ओबीसी यादीत समावेश करण्याचा आदेश केंद्र सरकारचे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाला मंजुरीकरीता पाठविला. परंतु 6 महिनेपेक्षा अधिक कालावधी झाली तरी आजतापावतो हा विषय केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयात कॅबिनेट मंजुरीकरीता प्रलंबित आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील 15 जातीचे विद्यार्थ्यांना शैक्षणिक व शासकीय नोकरीमध्ये आरक्षण प्रलंबित असल्याने नुकसान होत आहे. याबाबत महासंघाचे प्रतिनिधींनी भोयर पवार समाजाशी नाळ जुळलेले असलेले वर्धेचे नवनिर्वाचित खासदार अमरभाऊ काळे यांना भोयर, पवारचे प्रलंबित मागणीवर लक्ष देऊन न्याय मागण्याचे निवेदन दिले. त्यानिमित्ताने खासदार अमर काळे यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्री ना. वीरेंद्र कुमार खटिक यांना पत्र व भेट देऊन या विषयावर चर्चा करून न्याय देण्याची मागणी केली. राष्ट्रीय ओबीसी आयोग नवी दिल्ली यांनी दि. 8 ऑक्टोबर 2024 रोजी परित केलेल्या आदेशानुसार भोयर पवार समाज सह राज्य व केंद्रीय ओबीसी आयोगाने शिफारस केलेल्या इतर 14 जातीचा ओबीसी यादीत समावेश करणे करीता कॅबिनेट मीटिंग घेऊन त्वरीत निर्णय घ्यावा व महाराष्ट्रातील ओबीसी समाजाला न्याय द्यावा ही मागणी केली व आज लोकसभेत शून्य तासात हरकतीचा मुद्दा घेऊन केंद्र सरकारकडे भोयर, पवार समाजासह इतर 15 जातींना त्वरीत न्याय मिळण्यासाठी मागणी केली व पवार समाजाचे वैभव चक्रवेती राजा भोज यांचे जयघोषाने समार्पण केले. त्याबद्दल खासदार अमर काळे यांचे अखिल भारतीय भोयर पवार महासंघ व सहकारी सर्व संघटन तर्फे खूप खूप आभार मानले व महाराष्ट्रातील 15 ओबीसी जातींना न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा कायम ठेवावा अशी विनंती महासंघाचे सचिव मोरेश्वर भादे यांनी व्यक्त केली.




## अती काम करून पैशाच्या मागे न लागता कुटुंबाला वेळ द्या : डॉ. लोकेंद्र सिंग

### रेडियन्स क्षेत्र परिषद

**नागपूर :** लॉयन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3234॥ 1 लायन्स क्लब अमेझचे रिजन चेअरपर्सन लॉ नितीन लोणकर मार्फत हायलँड ग्लोरी सेलिब्रेशन अंबाझरी नागपूर येथे 23 मार्च 2025 ला मोठ्या थाटात रिजन कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लॉ डॉ. रीपल राणे, प्रमुख वक्ते डॉ. लोकेंद्र सिंग, न्यूरो सर्जन, माजी जिल्हा राज्यपाल बलबीर सिंग वीज, अतिथी विनोद वर्मा, श्रवणकुमार, भरत भलगट व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर-1, विलास साखरे, व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर-2 उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. लोकेंद्र सिंग यांनी संबोधित करतांना 30 ते 45 वयोगटातील तरुण पिढीतील




लोकांमध्ये अती कामाचा व्याप वाढल्यामुळे आणि जास्त वेळ काम केल्याने मेंदूतील रक्तस्त्राव स्पॉंडिलिसिस, हृदयविकार अशा प्रकारच्या अनेक बिमारीला समोर जावे लागत आहे. कॉन्फरन्समध्ये रिजन 10 अंतर्गत येणाऱ्या 13 क्लबने आपला सहभाग दर्शविला. कार्यक्रमाचे संचालन हेमंत आडगावकर यांनी केले तर आभार प्रदर्शन गुणवंत बालपांडे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यामागे मोनाली लोणकर आणि त्यांच्या टीमचा मोलाचा वाटा आहे.

## महिला वीज कर्मचाऱ्यास शिविगाळ व मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

**नागपूर :** थकीत वीज बिलाच्या वसुलीकरिता गेलेल्या महावितरणच्या महिला कर्मचाऱ्याला अश्लील शिविगाळ करित मारहाण करुन जिवानिशि मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पाचपावली महेंद्रनगर येथील रहिवासी मोहम्मद असद अब्दुल वाहाब कुरैशी याचेविरोधात कपिल्नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी शासकीय कामात अडथळा, अश्लिल शिविगाळ आणि जिवानिशी मारण्याची धमकी दिल्याबद्दल फिर्यादी सत्यभामा कृष्णाजी वानखेडे यांनी आरोपी मोहम्मद असद अब्दुल वाहाब कुरैशी याचेविरोधात कपिलनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गुरुवार दि. 27 मार्च रोजी दुपारी 12 च्या सुमारास महावितरणच्या नारा शाखा कार्यालयाचे सहायक अभियंता ब्रिजेश कुमार जगदीश यादव हे त्यांचे सहकारी नितीन कोल्हटकर यांचेसोबत जात असतांना हितक्षशिलानगर, नारा रोड निवासी हिरामल के, दोरसेटवार याने नितीन कोल्हटकर याचे हातातील वीज मीटर हिसकावून ते फ़ोडून मीटर्चे नुकसान करीत ब्रिजेश कुमार जगदीश यादव व त्यांच्या सहका-याला शिविगाळ केली. याप्रकरणी कपिलनगर पोलीस ठाण्यात ब्रिजेश कुमार जगदीश यादव यांनी केलेल्या तक्रारीवरून कपिलनगर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला.



रमाईचे स्वप्न - ४२

**शाक्यमुनी बुद्ध विहार न्यु नेहरू नगर, म्हाळगी नगर चौक नागपूर.**
स्थापना सन 1987लोटस पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज कार्यान्वित, धम्मदिना वाचनालय 3 आहेत अभ्यासिका, धम्मशिबीरांचे आयोजन. वर्षावास सर्व पोर्णिमांचे आयोजन, परिवर्तनवादी सर्व महापुरुषांच्या दिनविशेष, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक उपक्रम, 14 एप्रिल व बुद्ध जयंती.

संवाद मित्र
सुधाकर स्थूल, मो. नं. 9372665640

## रवींद्र जाधव ग्लोबल फाउंडेशनचे पुणे येथे आज उद्घाटन



**पुणे :** माजी राष्ट्रपती महामहीम प्रतिभा पाटील यांच्या काळात त्यांचे स्विय सहाय्यक म्हणून ज्यांनी पाच वर्षे राष्ट्रपती भवनात अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने कार्य केले, तसेच अमरावती येथे जिल्हाधिकारी म्हणून ज्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले, नाशिक जिल्ह्याचे विभागीय आयुक्त म्हणून ज्यांनी कुंभ मेळ्याचे उत्कृष्ट आयोजन केले, पुणे येथे राज्य माहिती आयुक्त असताना त्यांनी सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले असे सर्वांनाच आवडणारे रवींद्र जाधव आपल्याला परीचीत आहेतच. यांच्या स्मरणार्थ त्यांच्यावर अतोनात प्रेम असणाऱ्या सर्व आप्त जनांनी, मित्र मंडळीने रवींद्र जाधव ग्लोबल फाऊंडेशनची स्थापना येत्या शनिवारी दिनांक 29 मार्च 2025 रोजी सायंकाळी चार आयोजित केली आहे. हा कार्यक्रम पुण्याच्या बाणेर विभागातील बीबीसी टॉवरमध्ये संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला पद्मविभूषण पुरस्कार विजेते डॉ. कांतीलाल संचेती व पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार (भा.प्र.से.) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी(भा.प्र.से.), त्यांच्या पत्नी कमांडंट सी.आर.पी.फ. ग्रूप 1, अंचल दलाल (भा.पो.से.), सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील (भा.प्र.से.), पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, (भा.प्र.से.), वेकफील्ड कंपनीचे कार्यकारी संचालक मुकेश मल्होत्रा, महाराष्ट्राचे माजी ॲडीशनल डायरेक्टर जनरल टीकमचंद एस. भाल (भा.पो.से.), माजी विभागीय आयुक्त औरंगाबाद डॉ. पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से.), माजी कार्यकारी संचालक म्हाडा अरूण डोंगरे (भा.प्र.से.), पुणे झोन 1 चे पोलिस उपायुक्त संदीप सिंग गिल, छ. संभाजी नगरचे माजी खासदार उत्तम सिंह पवार, माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट (भा.प्र.से.), माजी आदीवासी आयुक्त संभाजी सरकुंडे (भा.प्र.से.), नेत्रतज्ज्ञ डॉ. संदीप डोळे, ज्योती राठौर, जयेश राठौर इत्यादी उपस्थित राहणार आहेत.

**नागपूर ताज फर्निचर ॲण्ड रिपेअर**



: संपर्क :
मो. 9511632051

## दैनिक बहुजन सौरभ येथे आविष्कार संगीत अकादमी तर्फे विशेष संगीत संध्याने मने जिंकली!

**नागपूर :** दैनिक बहुजन सौरभ आणि आविष्कार संगीत अकादमी परिवार तर्फे बहुजन सौरभ प्रांगणामध्ये नागपूर येथे गुरूवारी दि. 27 मार्च 2025 रोजी महिला दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात बहुजन सौरभचे मुख्य संपादक डॉ. सिद्धार्थ कांबळे, निवासी संपादक संध्या राजूरकर आणि आविष्कार संगीत अकादमीचे गझलगायक संगीतगुरु अनिल भगत यांच्या उपस्थितीत मंगल गाथेने झाली.

त्यानंतर हिंदी चित्रपटातील गायलेली प्रख्यात सुमधुर गीते गायकांनी सादर केली. सर्वप्रथम श्रीकांत भेंडे यांनी भक्ती गीत सादर केले.

महिला मंडळींमध्ये पल्लवी खोंडे यांनी उनसे मिली नजर, रत्ना मुन यांनी चंदन सा बदन, सुनीता रामटेकेनी आपकी आंखो में महके हुए ख्वाब है, निर्मला बुलकुंडे यांनी छुपा लो यू दिल मे, संध्या साळवे यांनी छू कर मेरे मन को, वंदना सूटे यांनी ओ मेरे दिल के चैन, प्रीती नगरारे यांनी पल पल दिल के पास, देवयानी भगत यांनी अंखियन संग अंखिया लागे, रजनी मोहोड यांनी ये राते ये मौसम, प्रतिभा सहारे यांनी मनाच्या धुंदीत




येना, रत्नदीपा कांबळे यांनी ये मेरा प्रेमपत्र पढकर, प्रणाली सातकर यांनी तू मेरी जिंदगी है आणि अन्नपूर्णा दुपटे यांनी होठो से छू लो, संध्या राजूरकर यांनी मै जिंदगी का साथ निभाता चला गया, ही गीते गावून प्रेक्षकांची मने जिंकलीत.

यानंतर पुरुष मंडळी मध्ये डॉ. सिद्धार्थ कांबळे यांनी दीवानो से मत पुछो, सुमेध कांबळे यांनी मेरे नैना सावन भादो, चंद्रशेखर चवारे यांनी तुम्हे देखती हू तो लगता है ऐसे, बाबा थुलकर यांनी ओ मेरे शाहेखुदा, रमेश लोखंडे यांनी तू दिल की धडकन है, रवी सहारे यांनी नैनो मे बदरा छाये, यश या नवीन सदस्याने मुसाफिर हू यारो आणि डॉ. सुनिल भगत यांनी दुनिया मे लोगोको धोका कभी हो जाता है ही गीते सादर करून प्रेक्षकांना रिझवले.

आविष्कार संगीत अकादमीचे गझलगायक संगीतगुरु अनिल भगत यांनी संगीतबद्ध केलेली विविध गीतांची मालिका सादर करत सगळ्या रसिकांची मने जिंकलीत.

डॉ. सिद्धार्थ कांबळे, मुख्य संपादक, संध्या राजूरकर निवासी संपादक, दै. बहुजन सौरभ यांनी संगीत संध्या निमित्त सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यकारी संपादक विलास गजभिये, संचालक ईश्वर रामटेके आणि अजय चौरे, दिलीप वानकर, इतर सदस्य, नातेवाईक, मित्रमंडळी कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

महिला दिन विशेष संगीत संध्याचे निवेदन व आयोजन डॉ. सुनिल भगत, रवी सहारे, श्रीकांत भेंडे आणि इतर पुरुष सदस्य मान्यवर मंडळी यांनी केले.

**जाहिरात**



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

**स्टुडिओ किरायाने देणे आहे**



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648